पुढारी MY ठाणे

मंगळवार, ८ जुलै २०१४

## विरार-डहाणू शटल



निर्देशांक २६ हजारांपार

पान ३

# कुंडली क्रेझ

निर्मातीच्या रूपात 'क'वाल्या मालिकांची महाराणी म्हणून एकता कपूरने इंडस्ट्रित स्वत:चं अस्तित्व निर्माण केलं. खरंतर 'क'वाल्या मालिकांनी एकताला नेहमीच साथ दिलीय. तिच्या मालिका कितीही डोकेदुखी असल्या तरी त्यातील कलाकारांमुळे त्या हिट होतात हेदेखील तितकंच खरंय. कारण निर्मितीबरोबरच मालिकेतील कलाकारांच्या निवडीबाबत ती नेहमीच जागरूक असते. आपण सगळेच जाणतो की, एकता ज्योतिषाचार्याला प्रचंड मानते. आधी-आधी एखाद्या स्क्रिप्टबाबत, मालिकेच्या मुहूर्ताबाबत ज्योतिषाचा सल्ला घेणाऱ्या एकताने आता आपल्या मालिकेतील कलाकारांच्या कुंडल्या पाहण्यासही सुरुवात केली आहे. 'कुंडली मॅच तो कलाकार मालिकेसाठी परफेक्ट मॅच' हा नवा फण्डा तिने शोधून काढलाय. नुकतेच तिने नवी हिंदी मालिका 'मेरी आशिकी तुम से ही'साठी ऑडिशन्स घेतले होते. परंतु त्या अनेकांमध्ये शक्ती अरोडा आणि राधिका मदानचीच प्रामुख्याने निवड केली. कारण मुख्य भूमिकेत असणाऱ्या या दोघांची कुंडली एकमेकांशी



# आदिवासींची घरे सौरदिव्याने उजळणार

## २० हजार आदिवासी विद्यार्थ्यांना झेडपी सौरदिवे देणार

**ठाणे : दिलीप शिंदे**

पाण्याच्या एका-एका थेंबासाठी तसरावे लागणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी रात्री विजेचा प्रकाश पडत असेल, याची कल्पनाच केलेली आहे. ही अंधारमय वस्तूस्थितीवर प्रकाशाने मात करण्यासाठी ठाणे जिल्हा परिषदेने प्राथमिक शाळेतील २० हजार विद्यार्थ्यांना सौर दिवेचा संच देऊन आदिवासी जीवन प्रकाशमय करण्याचा निर्धार केला आहे.



विद्यार्थ्यांना रात्री अभ्यास करता यावा, यासाठी सौर दिवे दिले जात आहेत. या दिव्यांमुळे अपारंपारिक ऊर्जेचा वापर होईल व त्याचे घर प्रकाशमय होईल. २० हजार घरे सौर दिव्यांच्या प्रकाशाने उजळून टाकण्याचा निर्धार झेडपीने केला आहे. त्यासाठी एक कोटी रुपये खर्च होणार असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी शेखर गायकवाड यांनी सांगितले.

जव्हार, मोखाडा, तलासरी, डहाणू, विक्रमगडसारख्या दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी वस्ती, पाड्यांतील जनता 'लाईट म्हणजे काय रे भाऊ' असे प्रश्न विचारतात. पहाटे उठणे आणि दिवस मावळण्यापूर्वी घरी परतणे हा नित्याचा जीवनक्रम असलेल्या आदिवासी मुलांना रात्री अभ्यासासाठी प्रकाश कुठे मिळणार. ज्यांच्या घरी वीज पोहचलेली आहे, ती भारनियमनामुळे गायब होत असते. दारिद्र्यामुळे विजेचे बिल भरू न शकल्याने जुन्या पारंपारिक पद्धतीच्या दिव्यांच्या प्रकाशात सत्र काढावी लागते. अशा प्रतिकुल परिस्थितीवर मात करण्यासाठी शिक्षणासारखा दुसरे आयुध नाही, याची जाणीव होऊ लागल्याने आदिवासी भागातील मुले शाळेत जाऊ लागली आहेत. या मुलांमध्ये शिक्षणाची गोडी लागावी म्हणून झेडपीच्या प्राथमिक शिक्षण विभागाकडून नाविण्यपूर्ण योजनेच्या माध्यमातून रेनकोट, बूट, दप्तरसारख्या सुविधा दिल्या जात आहेत. सायकलचाही पुरवठा होत असल्याने विद्यार्थ्यांची दररोज होणारी पायपिट बंद झाली आहे.